**<u>ठळक बातम्या</u>**

- विधानपरिषदेच्या १७ जागांसाठी द्वैवार्षिक निवडणुकीचं वेळापत्रक जाहीर; १८ जूनला मतदान, तर २२ जूनला मतमोजणी

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची नॉर्वेचे प्रधानमंत्री जोनास गहर स्टोर यांच्याशी शिष्टमंडळ स्तरीय चर्चा / स्वच्छ ऊर्जा क्षेत्रात सहकार्य आणि हरित धोरणात्मक भागीदारी दृढ करण्यावर सहमती

- नीट पेपरफुटीप्रकरणी क्लास चालक शिवराज मोटेगावकर याला पुण्यातून अटक

**आणि**

- पालघर जिल्ह्यात वऱ्हाडाच्या ट्रकला झालेल्या अपघातात १२ जणांचा मृत्यू, २० जण जखमी

**<><><><><>**

केंद्रीय निवडणूक आयोगानं महाराष्ट्र विधान परिषदेच्या १७ जागांसाठीच्या द्वैवार्षिक निवडणुकीचं वेळापत्रक जाहीर केलं आहे. स्थानिक स्वराज्य संस्थामधून निवडून द्यायच्या सोलापूर, अहिल्यानगर, ठाणे, जळगाव, सांगली-सातारा, नांदेड, यवतमाळ, पुणे, भंडारा- गोंदिया, रायगड- रत्नागिरी- सिंधुदुर्ग, नाशिक, वर्धा- चंद्रपूर- गडचिरोली, अमरावती, धाराशिव- लातूर- बीड, परभणी- हिंगोली आणि छत्रपती संभाजीनगर- जालना या १६ मतदारसंघांमधल्या सदस्यांचा कार्यकाळ संपल्यानं ही निवडणूक होणार आहे. यासोबतच चंद्रशेखर बावनकुळे विधानसभेत निवडून आल्यानं त्यांनी विधान परिषद सदस्यत्वाचा राजीनामा दिल्यामुळे रिक्त झालेल्या एका जागेसाठीही निवडणूक होणार आहे.

याबाबतची अधिसूचना येत्या २५ तारखेला जारी होईल. १ जूनपर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करता येतील, तर ४ जूनपर्यंत उमेदवारी मागे घेता येईल.

मतदान १८ जून रोजी होणार असून २२ जूनला मतमोजणी होईल. याबरोबरच संबंधित क्षेत्रात आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या पाच देशांच्या दौऱ्याच्या चौथ्या टप्प्यात प्रधानमंत्र्यांनी आज नॉर्वेचे प्रधानमंत्री जोनास गहर स्टोर यांच्याशी शिष्टमंडळ स्तरावर चर्चा केली. स्वच्छ ऊर्जा क्षेत्रात सहकार्य वाढवणं, हरित धोरणात्मक भागीदारी दृढ करण्याविषयी दोन्ही नेत्यांनी यावेळी सहमती दर्शवली. तसंच व्यापार आणि गुंतवणूक, नवीकरणीय ऊर्जा, विज्ञान आणि तंत्रज्ञान, नील अर्थव्यवस्था, चक्रीय अर्थव्यवस्था, कृत्रिम बुद्धिमत्ता, अंतराळ आदी क्षेत्रातलं सहकार्य वृद्धिंगत करण्याविषयी दोन्ही नेत्यांनी चर्चा केली.

गेल्यावर्षी झालेला भारत - युरोपियन युनियन मुक्त व्यापार करार हा भारत आणि नॉर्वेच्या सामाजिक प्रगतीचा आराखडा आहे, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेेंद्र मोदी यांनी चर्चेनंतरच्या संयुक्त निवेदनात केलं.

**होल्ड बाईट मोदी**

<><><><><>

नीट यूजी पेपरफुटी प्रकरणी लातूर शहरातल्या रेणुकाई केमिस्ट्री क्लासेस चालवणाऱ्या शिवराज मोटेगावकर या संचालकाला सीबीआयनं पुण्यातून अटक केली आहे. काल या प्रकरणाच्या चौकशीत मोटेगावकरच्या मोबाईल फोनमध्ये नीट परीक्षेची फुटलेली प्रश्नपत्रिका सापडली होती. त्यामुळे आज अटकेची कारवाई करण्यात आली. या प्रकरणात सीबीआयनं मोटेगावकरची ११ तास चौकशी केली होती. त्यानंतर त्याच्या लातूर इथल्या प्रशिक्षण केंद्रात शोधमोहीम राबवून सीबीआयनं संशयास्पद दस्तऐवज, संगणक आणि मोबाईल फोन जप्त केले होते. या प्रकरणात सहभागी असणाऱ्या टोळीचा मोटेगावकर हा सक्रिय सदस्य आहे. त्यानं

इतर आरोपींशी संगनमत करून २३ एप्रिल रोजी होणाऱ्या परीक्षेपूर्वी ही प्रश्नपत्रिका मिळवून अनेक जणांना दिली, असं सीबीआयनं म्हटलं आहे.

दरम्यान, या प्रकरणात सीबीआयनं आतापर्यंत दिल्ली, जयपूर, गुरुग्राम, नाशिक, पुणे, लातूर आणि अहिल्यानगर इथून दहा आरोपींना अटक केली आहे. गेल्या चोवीस तासात सीबीआयनं पाच ठिकाणी शोधमोहीम राबवली आणि अनेक कागदपत्रं, संगणक तसंच मोबाईल फोन जप्त केले.

<><><><><>

नीट परीक्षा पेपरफुटी प्रकरणात आज नांदेड स्टुडंटस् फेडरेशन ऑफ इंडिया जिल्हा समितीनं नांदेड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर तीव्र निदर्शनं केली. या गंभीर घोटाळ्याची नैतिक जबाबदारी स्वीकारून केंद्रीय शिक्षण मंत्र्यांनी तत्काळ आपल्या पदाचा राजीनामा द्यावा, अशी मागणी संघटनेनं केली आहे.

नीट पेपरफुटी प्रकरणी सीबीआयनं अटक केलेल्या शिवराज मोटेगावर याच्या लातूर इथल्या प्रशिक्षण केंद्रासमोर शिवसेनेनं आज आंदोलन केलं. विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी आंदोलकांनी केली.

<><><><><>

सिंचनाचा अभाव हेच विदर्भातल्या  शेतकरी आत्महत्यांचं प्रमुख कारण असून जलसंवर्धनाच्या माध्यमातून शेतकऱ्यांचं जीवन बदलू शकतं, असं  केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी आज सांगितलं. त्यासाठी प्रत्येक गावात जलसंवर्धन, नदी खोलीकरण आणि रुंदीकरणाची कामं लोकसहभागातून केली जावीत, असं आवाहन त्यांनी केलं. ते नागपूर इथे ‘जलक्रांती परिषद २०२६ मध्ये बोलत होते. पुराच्या स्वरूपात वाहून जाणारं  पाणी रोखलं तर शेती आणि गावांचं भवितव्य बदलू शकतं. मात्र नदी स्वच्छ ठेवणं ही फक्त सरकारची नाही तर प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे, असं ते म्हणाले.

<><><><><>

राज्यातल्या ऐतिहासिक तसंच धार्मिक स्थळांच्या जतन आणि संवर्धन याला शासनाचं प्राधान्य आहे, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज सह्याद्री अतिथीगृह इथं झालेल्या विविध तीर्थक्षेत्र विकास आराखडा शिखर समितीच्या बैठकीत  सांगितलं. या बैठकीत राज्यातल्या  सहा तीर्थक्षेत्रांच्या विकासासाठी एकूण ९९३ कोटी ७२ लाख रुपयांच्या विकास आराखड्यांना आणि निधीला मंजुरी देण्यात आली.

<><><><>

मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर आज दुपारी वऱ्हाडाच्या ट्रकला झालेल्या अपघातात १२ जणांचा मृत्यू झाला तर २० जण जखमी झाले. महामार्गावर पालघर इथे धानीवरी जवळ लग्नाचं वऱ्हाड घेऊन जाणारा ट्रक आणि कंटेनरची टक्कर झाल्यानं हा अपघात झाला. ट्रकमध्ये १००पेक्षा जास्त वऱ्हाडी होते, अशी माहिती मिळत आहे. जखमींवर कासा तसंच धुंदलवाडी इथल्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

<><><><>

केरळमध्ये संयुक्त लोकशाही आघाडीचे मुख्यमंत्री म्हणून काँग्रेसचे व्ही. डी. सतीशन यांनी आज शपथ घेतली. थिरुवनंतपुरममध्ये राज्यपाल राजेन्द्र आर्लेकर यांनी त्यांना पद आणि गोपनियतेची शपथ दिली.  सतीशन यांच्या सोबत वीस जणांनी मंत्रीपदाची शपथ घेतली. यामध्ये वरिष्ठ काँग्रेस नेते रमेश चेन्नीथला, के. मुरलीधरन, ए.पी अनिलकुमार, तसंच केरळ प्रदेश काँग्रेस समितीचे अध्यक्ष सनी जोसेफ यांचा समावेश आहे. मुस्लिम लीगचे पी. के. कुनहलीकुट्टी, आरएसपी नेते शिबू बेबी जॉन, केरळ काँग्रेसचे मॉन्स जोसेफ, केरळ काँग्रेस जेकबचे अनुप जेकब आणि सीएमपीचे सी.पी. जॉन यांनीही शपथ घेतली.

काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, नेते राहूल गांधी तसंच प्रियांका गांधी वड्रा त्याचबरोबर काँग्रेसशासित राज्यांचे मुख्यमंत्री शपथविधीला उपस्थित होते. केरळचे

माजी मुख्यमंत्री पिनराई विजयन यांच्यासह माकपचे आणि भाजपाचे नेतेही शपथविधीला उपस्थित होते.

**<><><><>**

कांद्याचे भाव पडल्याच्या निषेधार्थ छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात वैजापूर इथं समृद्धी महामार्गावर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या कार्यकर्त्यांनी चक्काजाम आंदोलन केलं. यावेळी आंदोलकांनी रस्त्यावर टायर जाळलं तसंच रस्ता अडवला, त्यामुळे काही काळासाठी वाहतूक कोंडी झाली होती. सरकारनं योग्य दरात कांदा खरेदी करावा अशी मागणी आमदार अंबादास दानवे यांनी यावेळी केली.

नाशिक जिल्ह्यात लासलगाव इथं राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षानं आमदार रोहीत पवार यांच्या नेतृत्वाखाली गळ्यात कांद्याच्या माळा घालून आंदोलन केलं. राज्य सरकारनं कांद्याला तेराशे रुपयांऐवजी चोवीसशे रुपये प्रतिक्विंटल इतका दार घोषित करावा, तसंच कांदा कृषी उत्पन्न बाजार समित्यांमधूनच खरेदी करावा अशा मागण्या यावेळी करण्यात आल्या.

**<><><><>**

मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समध्ये आज दिवसअखेर ७७ अंकांची वाढ झाली आणि तो ७५ हजार ३१५ अंकावर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी ६ अंकांची किरकोळ वाढ नोंदवत २३ हजार ६५० अंकांवर बंद झाला.

**<><><><>**

इंधन दरवाढीच्या पार्श्वभूमीवर एसटी भाडेवाढीचा प्रस्ताव विचाराधीन असला तरी तात्काळ भाडेवाढ केली जाणार नाही, असं परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितलं. ते आज मंत्रालयात एसटी महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बैठकीत बोलत होते. डिझेलच्या दरात झालेल्या वाढीमुळे महामंडळावर वार्षिक सुमारे १२४ कोटी रुपयांचा अतिरिक्त आर्थिक भार पडणार

आहे. त्यामुळे तात्काळ भाडेवाढ होणार नसली तरी भविष्यात तिकीटांचे दर वाढू शकतील, असं सरनाईक म्हणाले.

<><><><><>

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज चेन्नई सुपर किंग्ज आणि सनरायझर्स हैदराबाद यांच्यात सामना होणार आहे. चेन्नईतल्या चिदंबरम स्टेडिअमवर थोड्याच वेळात, साडे सात वाजता हा सामना सुरु होईल.

चेन्नई सुपर किंग्जनं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करायचा निर्णय घेतला आहे.

<><><><><>

अकोला जिल्ह्यात उन्हाचा तडाखा दिवसेंदिवस तीव्र होत असून कमाल तापमानात सातत्याने वाढ होत आहे. या पार्श्वभूमीवर हवामान विभागाने अकोला जिल्ह्याला आज उष्णतेचा ऑरेंज अलर्ट दिला आहे. दरम्यान, अकोल्यात तेल्हारा तालुक्यातल्या पिंपरखेड इथं उष्माघातामुळे एकाचा मृत्यू झाला.

<><><><><>

गेल्या २४ तासात कोकण आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी पाऊस पडला. राज्यात सर्वात जास्त कमाल तापमान अकोला इथं ४६ पूर्णांक ३ दशांश अंश सेल्सिअस नोंदलं गेलं.

येत्या दोन दिवसात कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. या काळात मराठवाडा आणि विदर्भात उष्णतेची लाट राहील.

//<><><><><>//